क्रं.ई-५/यंचा ते प्रयंचा पदोन्नती/ 5907 /२०१३
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश,म.राज्य, पुणे ८ यांचे कार्यालय
दिनांक 29 /०८/२०१३

विषय :- पोलीस बिनतारी संदेश विभागतील पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) यांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ( प्रमुख यंत्रचालक ) या पदावरील पदोन्नतीवर नेमणुक व व प्रमुख यंत्रचालक यांचे बदलीबाबत.

-----000-----

**आ दे श :-**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस हवालदार ( बिनतारी यंत्रचालक ) यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ( प्रमुख यंत्रचालक )या पदावर कार्यभार ग्रहण केलेल्या तारखेपासून स्थानापन्न व निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येऊन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नेमणूका करण्यात येत आहेत.

**वेतनश्रेणी :- यंत्रचालक सुधारीत वे.श्रेणी : ५२००- २०२००/- ग्रेड पे . २४००/-**
**प्रमुख यंत्रचालक सुधारीत वे.श्रेणी : ५२००- २०२००/- ग्रेड पे . २८००/-**

| अ. क्रं | कर्मचा-याचे नाव व प्रवर्ग | सध्या कार्यात असलेले ठिकाण (कोठून) | पदोन्नतीवरील बदलीचे ठिकाण आस्थापना | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटील निवास गणपत | मुंबई शहर पोउपआ.बि.सं.मुंबई | मुंबई शहर पोउपआ.बि.सं.मुंबई | खुला | रिक्त पदी |
| २ | घाटबांधे मधुकर रुपचंद | पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण | मुंबई शहर पोउपआ.बि.सं.मुंबई | खुला / इमाव | रिक्त पदी |
| ३ | सुळेभावेकर रामचंद्र वैजू | समादेशक,रारापोबल गट क्रं ८,मुंबई | सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग | खुला | रिक्त पदी |
| ४ | पोंदे सुनिल मारोतराव | वर्धा पोलीस अधीक्षक, वर्धा | रत्नागिरी पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | खुला / इमाव | रिक्त पदी |
| ५ | कांबळे शंकर भुपाल | समादेशक,रारापोबल गट क्रं ८,मुंबई | सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग | अनु.जाती | रिक्त पदी |
| ६ | गव्हाणे नामदेव बापूराव | नांदेड पोलस अधीक्षक, नांदेड | हिंगोली पोलीस अधीक्षक, हिंगोली | भ.ज.- ब | रिक्त पदी |

उपरोक्त कर्मचारी **यांचे पेक्षा सेवाजेष्ट असलेले त्यांचेच प्रवर्गाचे मागासवर्गीय कर्मचारी यांनी अद्यापही जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही.** त्यामुळे उपरोक्त कर्मचारी यांना शासन निर्णय क्रं बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/-ब, दिनांक १६/०६/२००८मधील अटी व शर्तीना अनुसरुन **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची व फक्त ११ महिन्यांसाठी** प्रमुख यंत्रचालक या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.**सदर कालावधीमध्ये वरील कर्मचा-यापेक्षा सेवाजेष्ठ असलेल्या कर्मचा-यांनी त्यांची जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास उपरोक्त कर्मचारी यांना त्या त्या संवर्गातून देण्यात आलेली निव्वळ तात्पुरती स्वरुपाची त्यांची पदोन्नती समाप्त करणेत येवून त्यांना मूळ पदावर नेमणुक देण्यात येईल व त्यांचे सेवाज्येष्ठतेत काहीही बदल होणार नाही याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त कर्मचा-या विरुध्द विभागीय चौकशी / कोर्ट केस / अन्य चौकशी चालू असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, शिक्षेची अंमलबजावणी होणेसाठी पदोन्नतीच्या उच्च पदावर ते शिक्षा भोगण्यास तयार असल्याबाबत लेखी संमती पत्र संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचेकडून त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करणे पूर्वी घ्यावे . जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

उपरोक्त पो हवा/यंत्रचालक यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी त्वरित कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच संबंधित युनिट अधिका-यांनी पो.हवा/ यंत्रचालक यांना सोडल्याच्या / पदोन्नती हजर झाल्याच्या तारखा उलट टपाली या कार्यालयास कळवाव्यात. तसेच ३० दिवसाच्या आंत पो.हवा/यंत्रचालक यांनी पदोन्नती स्विकारुन बदली ठिकाणी हजर व्हावे अन्यथा त्यांची सेवाज्येष्ठता ते हजर होतील त्या दिनांकापासून लावण्यात येईल याची नोद घ्यावी.

सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

सदरच्या पदोन्नतीवरील नेमणुक मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे प्रलंबित रिट पिटीशन क्रमांक ८४५२/० ४ मधील अंतिम निकालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८ / प्रक्र - १३ / ९८ / सेवा -१० दि.१० / १२ / ९८ च्या आदेशाची माहिती सहा.पोलीस उप निरीक्षक/ प्र.यं.चा. या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन ) नियम - १९८१, नियम क्र.११(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

कालबध्द पदोन्नती घेतली असल्यास संबंधीत कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही संबंधीत कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबध्द पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी ) काढून घेण्यात यावी व त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

उपरोक्त पदोन्नती झालेल्या पो.हवा/ यंत्रचालक यांचे सबंधीत आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये पदोन्नतीचा आदेश कमांक व दिनांकाची नोद घ्यावी

**( सुरेश कक्कड )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,
पुणे

प्रति,

पोलीस आयुक्त,मुंबई शहर
पोलीस उप आयुक्त,बि.सं.मुंबई शहर
पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामिण / वर्धा / नांदेड/सिधुदुर्ग/ रत्नागिरी / हिंगोली.
समादेशक,रा.रा.पो.बल गट क्रं ८ मुंबई

प्रत : पोलीस अधिक्षक बि सं, पश्चिम विभाग,पुणे / पूर्व विभाग, नागपूर
सहा. पोलीस आयुक्त बि.सं. मुंबई शहर(मलबार हिल)
पोलीस उप अधीक्षक,बि.सं.नागपूर परिक्षेत्र/नांदेड परीक्षेत्र/ कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई
पोलीस निरीक्षक बिनतारी संदेशनागपूर ग्रामिण / वर्धा / नांदेड/सिधुदुर्ग/ रत्नागिरी / हिंगोली/ गट क्रं ८ मुंबई

स्थानिक प्रती :-

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.
पोलीस उप अधिक्षक बिनतारी संदेश, वाहतूक / सायफर, संचालक कार्यालय,पुणे .
गृह पो नि बि सं,संचालक कार्यालय, पुणे/ मतका पुणे/ कार्यालय अधिक्षक / स्वीय सहाय्यक / लघुलेखक /
प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - १ व २/भरती कक्ष /क'शाखा /ई-३ लिपीक / आदेश -फाईल.